

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१३०

# अपभ्रंश

चंद्रकांत खोत

REFBK-0018856
REFBK-0018856

સંદર્ભ
વાર્તા
૨૧૩૦
૧૦૬૩
૧૧૧૯

अपभ्रंश

चंद्रकान्त खोत यांची इतर पुस्तके

मर्तिक १९६९
उभयान्वयी अव्यय १९७०
बिनधास्त १९७२

**आगामी**

विषयान्तर

# अपभ्रंश

चंद्रकान्त खोत

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८८५६
संदर्भ शाखा

२१०६३ 
२९३०

REFBK-0018856
REFBK-0018856

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पुणे : ३०

प्रकाशक : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर कॉलनी, पुणे ३०

मुद्रक : चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय, ४६१/४ टिळक रोड, पुणे ३०

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

अपभ्रंश
© सर्व हक्क सुरक्षित

प्रकाशन क्रमांक : ६२६
प्रथमावृत्ती : नोव्हेंबर १९७३

किंमत : साडेचार रुपये

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

*मनातलं कागदावर उतरवताना*
*ज्यांच्याकडून पहिली प्रेरणा मिळाली*
*ते माझे गुरुजी*
*श्री. व. स. पाटील*
*ह्यांच्यासाठी*

२९३० १।११८४

## अनुक्रम


वण / १
मन / २
अपभ्रंशाच्या कविता / ३
आभाळ / ६
रात्र / ७
फास / ८
यशोदा / ९
संदर्भाची कविता / १०
श्वासांची कविता / ११
तडिपार / १२
काळोखाच्या कविता / १३
मेंदूतील आंदोलनांचं झाड / १७
सोसायट्यांच्या थंडगार सावल्या / १८
बंदोबस्तात / २१
चळत / २२
एकाकी / २३
मुमताज / २४
थारोळं / २५
पाण्यावर आली साय / २६
पडसादाची कविता / २७
मृत्यूनंतरची कविता / २८
परिक्रमा / २९
प्राक्तन / ३४
तू : एक काळोख / ३५
पांजरपोळ / ३७
उधळ पट्टी / ३८
दुपार : २९ फेब्रुवारी १९६९ / ३९
आकाशाचा कात / ४०
पान्हा / ४१
देणे / ४२
मेघांच्या पडछायांचे प्राथमिक शोक / ४३

डायरीतले एक पान / ४४
बिग क्लोज-अप मधल्या चेहऱ्यावर / ४५
च चरे चरसातला / ४६
गटारी अभंग / ४७
अनुक्रमणिका / ४८
सार्वकालीन मीमांसकांनो / ४९
तळटीपा : १ / ५०
तळटीपा : २ / ५१
मी निःशंक नग्न झालोय / ५२
त्रैराशिक / ५३
संस्कृती / ५४
उत्तरक्रिया / ५५
प्रणांतिक जखमांची वस्त्रे / ५८
पुतळ्यांचे साम्राज्य / ५९
सत्य / ६०
रफार / ६१
इन्काराची कविता / ६२
दान / ६३
कागजके फूल / ६४
टक्कल पडलेला सूर्य / ६५
चिव चिमणे मलमली स्तन / ६७
ओल्या बाळंतिणीसारखे / ६८
मास्तर मास्तर भिरकवडे / ६९
हँगर / ७०
ठसे / ७१
हाच वारा जर मनात जिरेल / ७२
गटारी अमावास्या / ७३
ओरखड्याची कविता / ७४
कबरस्तानातील जळत्या मेणबत्त्या / ७५
शुक्रवारचे गीत / ७६

काही माणसे / ७७
पूर्वदत्त सामग्रीची कविता / ७९
दळदार डोळ्यांचे कलंदर इतिहास / ८०

ईश्वराच्या दिव्याखाली अपभ्रंशाचा अंधार

### वण

तुडुंबले माझे मन
परि आत डोकावता
बिन बरसाती घन.

अभंगले माझे मन
परि माझिया माथा
टाळ-मृदुंगाचा वण.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १८५६
मुंबई शाखा (स्थळ

## मन

दुभंगले माझे मन
नदीकाठ घामाघुम
पर्णभार ढाळितसे
उरि वेदना जपून.

वडाखाली बुंध्यापाशी
आळवित सुने गीत
माझ्या डोळा येता पाणी
ओल झाली वेडीपिशी.

ढळलेल्या पानावर
रेषांचेच झाले खूर
टपटप गळताना
मन धावे दूरदूर.

पानरेषा जुळताना
देठ आले रे वाकुन
नदीकाठ घामाघुम
खुपे डहाळीला वण.

**अपभ्रंशाच्या कविता**

**एक**

सर्दाळलेल्या आठवणींना अपभ्रंशाची बुरशीचढून
जेव्हा ख्रिस्तावरले खिळे गंजतात
त्रयस्थ टाळ्या पिटीत बकव्रासाची पखवाज वाजवतात
उत्तरदक्षिणपूर्वपश्चिम मेलकांडत जातो
शराबी वारा बारशाच्या घुगऱ्या खाऊन सर्वांच्या
देवळात कापुर जळताना सर्वांगाला कापरे भरणारा
देव सर्वदेखत कडिकुलपात बंद होतो
खांब तुळया जड भुवया भुकेलेले अवयव
साऱ्याच गवयांना सा लावताना मुशाहिऱ्याची
लागते उचकी समेवर येताना
बेचकीतल्या खड्यांना चिमण्यांची गर्दन मालवता
मालवता स्वप्न पडते जिभेच्या स्पंदनाचे
पिंजून पिंजून गर्भिणी होतात गर्दभगायिनी.

सर्दाळलेल्या आठवणींना अपभ्रंशाची बुरशी चढून
जेव्हा अक्षरांची कूस उजवली जाते
आत्म्याला पडलेले भोक बुजवता बुजवता
घरंगळून सुटतात उपमालंकाराचे चिल्लर दाणे
प्रार्थनावासीयांचे चेहरेमोहरे सीलबंद होतात
ख्रिस्तावरल्या खिळ्यांना चढलेली गंज
खरवडताना किती पिढ्या खर्ची पडतात
त्याचे हिशेब ठेवताना चित्रगुप्तालाही येते भोवळ.

बोलघेवड्यांनो, बोला आता : हरे राम हरे कृष्ण
अरे, हे अपभ्रंशाचे टाळ हातात केव्हा आले ?

**अपभ्रंशाच्या कविता दोन**

या वास्तवाचा मी अपभ्रंश असतो तेव्हा
सुरकुतलेल्या चेहऱ्याचा ईश्वर
विस्तवावर आपल्या अस्तित्वाची भाकर करपवत असतो.

'सदरे घ्या रे सदरे; सुखी माणसाचे सदरे'
टाचा घाशीत विक्री करणारा तो कालपुरुष
एका रात्री गप्पगार होतो.

किमान श्वासोच्छ्वासाची एक रेघ पाण्यावर
उमटताना धन्य होते पायावर उभारलेले शहर
ईश्वराच्या दिव्याखाली अपभ्रंशाचा अंधार.

**अपभ्रंशाच्या कविता तीन**

होकारातल्या नकाराचे आर्सेनिक होते
आणि गरोदरातील ' रो ' मधल्या ओकाराचा ओंकार
कालची पापे मुद्रणदोषात बुचकळून येतात
सावल्यांच्या अपभ्रंशात झाडे चळाचळा मुततात.

ह्या नगराच्या प्रत्येक घराला अपभ्रंशाचे ब्रनवॉशिंग
ह्या नगरातल्या प्रत्येक बापयाच्या गुडघ्याला बाशिंग

जो तो आपले बाशिंगबळ चाचपताना म्हातारा होतो
अपभ्रंशाच्या वेलीने जिनेंद्र आपले शरीर व्यापतो.

अपभ्रंशाच्या या मायावी राक्षसांच्या लांब केसात
उवांची घरे भरभराटीला येतात
म्हणून वहाणांच्या करकरीवर
टॅक्स बसवतात शहाणी माणसे.

**आभाळ**

रक्तात खुळ्खुळ्ली नाणी = पायात उतरली गाणी
∵ आभाळ नागवे झाले ∴ थरथरली पापणी

रक्तात भिनलाय अल्कोहोल = पायात दर्या खोलखोल
∵ आभाळ नागवे झाले ∴ झाड फिरतेय गोलगोल

रक्तात रुजले सूर = पायात पारवे चूर
∵ आभाळ नागवे झाले ∴ झाकुन घेते ऊर

## रात्र

काळोखाचे काळे काजळ डोळ्यात घालून : रात्र
पिंपळपानाची सळसळ पायात बांधून : रात्र
आकाशचांदण्यांची चंद्रकळा नेसून : रात्र

डोळ्यात प्रतीक्षेचा अभिसार : रात्र
प्रियकर तिचा बेकरार : रात्र
वाट पाहून पाहून ती थकली : रात्र
पहाट होताच पांढरीफटक पडली : रात्र

## फास

काचेआड निळे रंग
अनंगच हाती यावे
निळ्या स्वप्नांचे हे थवे
ओठांनाच भास व्हावे.

उरी निळ्या सागराची
लाट अशी उधळावी
नीलबिंदूंना पाहता
नाव माझी हरवावी.

निळी निळी यावी सर
जावे असे झपाटुन
निळ्या निळ्या सावरीचा
यावा कापुस पिऊन.

निळाईत व्हावा ज्वर
व्हावा मृत्यु निळा भास
निळ्या माझ्या आकांक्षेला
आवळावे निळे फास.

## यशोदा

ऊन बांधू उखळीला
करू आभाळाचे दावे
सावलीला ठेवू साक्षी
हलकेच दूर व्हावे.

काल यमुनेच्या काठी
झाडे झाली गवळणी
वस्त्रे दिसेनाशी होता
बावरले निळे पाणी.

केळ आडोशाला न्हाली
सांभाळीत वक्षभार
दिठ स्थिर होता होता
ऊन झाले दामोदर.

जआ सापडले हाती
उखळीने क्रूर व्हावे
परि वेदनेची कळ
एका यशोदेला ठावे.

**संदर्भाची कविता**

गर्भवतीच्या पावलांचे संकेत मला नाकारता येतात
काजळाची नाती विनायास पुसताही येतात
उकळत्या पाण्यात आकाशालाही भाजून काढतो मी
तळहातावर पाऱ्याच्या पोरांना जोजवतो मी

या संदर्भाच्या जगात मी नंगाच असतो
म्हणून रानाला आगी लावणारेच फार निघतात
या संदर्भाच्या जगात कडीकुलपेच फार
म्हणून तोंडाला टाळे ठोकणारे निपजतात काय ?

इये संदर्भाचिये नगरी ।
गर्दभांचा सुकाळू करी ।

**श्वासांची कविता**

अनाकलनीय श्वासांचे कोसळते उत्पात
तू तुझ्यात सामावून गहिवरतेस
डबक डबक डोळ्यांचे अनावर आवर्त
सतत दिठीसमोर सामोरे
प्रत्ययहीन निखळ शब्दांची ओझी
डोळ्यांच्या कडांना लटकून.

माईममधले पांढरेभडक मुखवटे
उच्छ्वासांचे आवश्यक अनावश्यक
धारणाच अशी मासोळीगत सुळसुळीत.

श्वासांची वरात तुझ्या घरासमोरून
तुझे कलेवर तुझ्याच घरात कोरून.

## तडिपार

पोपटी पाण्याच्या तडिपार गळ्यात तुझे असते गाणे
स्वरयंत्राच्या नाजूक पखाली
करकरीत तिनसानच्या फतकललेल्या मांडीवर
मलपीत दडून बसलेल्या गव्हाळी पुडिंगवर
तुझे गाणे मी डबाबंद करतोय.

खळखळून उमळलेल्या उत्सवी ढासेसाठी
पावणेर म्हणून उद्याचा दिवस राखून ठेवलाय
कराग्रे वसते लक्ष्मीच्या गळीबोळात.

कुलक्षय होणाराय शब्दांच्या फेसलेल्या द्रवात
पोपटी पाण्याच्या तडिपार गळ्यात तुझे असते गाणे

व्रतस्थ हलकल्लोळाचा असतो एक हंगाम
गनीमही गरोदर राहू शकतो अशी एक शक्यता
याच्याही पलिकडे आहे तुझ्या गाण्यात
एका विवस्त्र शंकाखोर प्रथमस्पर्शी देहाचा उतार.

तुझ्या गाण्यात सारे काही फ्रीज होताना
मी तडिपार.

**काळोखाच्या कविता**

**एक : काळोख्या पिढीसाठी**

शिलाजित सेवून मातलाय माझ्यातला इंद्रियस्थ काळोख
दूर जंगलझाडीत सुस्त पडलाय अजगर
मनगटावरल्या प्रत्येक केसावर वसतेय एक शहर
काळोख फिरतोय हगुरडा होउन श्वासातून
किंवा उच्छ्वासातून
किंवा शिलाजिती भुते नाचताय्त जंगले होऊन
नाकपुडीतल्या केसांनिशी
काळोखाचे कण तरंगत तरंगत सरकताय्त
आणि एक अतिसूक्ष्म ॲनॉटमी रूप घेतेय
माझ्या इंद्रियस्थ पौरुषावर एकेक तीळ
जमा होतोय
उद्याच्या काळोख्या पिढीसाठी.

**दोन :**
**गस्त**

रस्ता सुजलाय काळोखात
आणि मिणमिणणारे दिवे हळद ओकतायत
किंवा एखादे चुकून जगलेले झाड
काळोख चिवडीत बसलेय.

मी भटकतोय पोलिसाच्या गस्तीसारखा
हातातली काठी आपटत
मी पाहतोय.......काळोख स्वतःलाच पितोय
मी पाहतोय......झाड स्वतःलाच भितेय
आणि काळोखाला मिठी मारून कुणीतरी झोपलंय
एक आंधळा, काठी आणि एकतारी
एक सृजनशील आत्मा खचाखच काळोख
काळोखाला काळोखाची पिल्ले.

मी भटकतोय पोलिसाच्या गस्तीसारखा
गर्भमुक्त अस्ताव्यस्त अगस्ती.

**तीन : लोडिंग-अन्‌लोडिंग**

काव‌डी भरभरून मी वाहून आणतोय काळोख
माझी कालची पुण्याई
डोळे भरभरून मी वाहून आणतोय काळोख
माझी कालची पुण्याई.

माझ्या शरीरात काळोखाचे
लोडिंग-अन्‌लोडिंग.

काळोख प्रवासाला निघालाय
काळोख चळू लागलाय
काळोख झिंगू लागलाय
ही माझी कालची पुण्याई
प्रवासात त्याचे तहानलाडू भूकलाडू
भूक-तहान
लोडिंग-अन्‌लोडिंग

८७०६३
2930

**चार :**
**फेस**

पांढरधोप प्रकाश गालावर आसवं
पुळणीवर लोळतायत् काळोखाची कासवं
काळोख बनतोय काखेतले केस
माझ्या मनावर तिच्या स्तनांचा फेस

**मेंदूतील आंदोलनांचं झाड**

मेंदूतील आंदोलनांचं झाड
गळाबंद जोधपुरी कोट घालून
सांकेतिकतेचा वाढवून घेतं भत्ता
ॲकॅडेमिक दन्तरेषा हा विषय अनिवार्य

उपरं आकाश घेतं एनिमा
आणि पटापट पडतात रुपयांचे ढीग
या रुपयांचं लिंग कुठलं ?
पुल्लिंग ? स्त्रीलिंग ? नपुंसकलिंग ?

घोड्यांची ओकीबोकी मिरवणूक रेसकोर्सवर
लीदेचाही पंचनामा फोटोफिनिशमधे
फटीतून कबुलीजबाब पाझरताना
रात्र अंगावरून गेली तरी
चेहरे कसे बदलत नाहीत ?

या स्मशानातली प्रेतं
राहतात रातभर चिलीम ओढत
म्हणून तक्रार करणाऱ्याने
गळाबंद जोधपुरी कोट घालून
सांकेतिकतेचा वाढवून घ्यावा भत्ता.

| | |
|---|---|
| **सोसायट्यांच्या** | व्याकरण चालवताना दमलेल्या विद्यार्थ्यांचा |
| **थंडगार** | हा वर्ग |
| **सावल्या** | सोसायट्यांच्या थंडगार सावलीत |

१

उनाचं पंचांग ढवळीत :
मी इथलाच एक टेनन्ट
माझ्या खंगलेल्या शरीराची पाती परजत
खुंटासारखा रुजलोय
ऑप्टिशियन्सची एक पिढीच्या पिढी
माझ्या डोळ्यात आपली पालं
ठोकून होती
आमच्या येथे ‘ मोफत ’ डोळे तपासून दिले जातात !

२

कर्ता कर्म क्रियापदाच्या गप्पा
आता खूप झाल्या
सोसायट्यांच्या जिन्यावर त्यांची
झाली आहेत खूप थोटकं
आणि बल्ब साठाचा साठ वर्षं बेपत्ता
शिरसावंद्य काळोखाच्या आज्ञा
सवयीनं मानमोडीचा रोग पसरलाय
पसरतोय झपाट्यानं
यह आखिरी कश तक मजा देती है ।

३

स्टुडिओची सवत डेव्हलपिंग रूम
सोसायट्यांच्या थंडगार सावलीत

डेव्हलप होतोय काळ्या वस्त्रांचा
घसघशीत दर्प
हायपो, हायड्रो, क्विनाईन, पोटॅशियम ब्रोमाईड
सोडियम कार्बोनेट
प्रखर दिव्यांचे स्टॅण्ड्स गॉगल लावून
येथे जन्माला येतेय निगेटिव्ह
बाराव्याचे सोहळे धूमधाम आणि
साळकाया माळकाया कडिकुलपात बंद
शुभं करोति कल्याणम् आरोग्यं धनसम्पदा ।

४ भोवतालची सारी प्रतिबिंबं स्वर्गवासी
होतात एकेक
सोसायट्यांच्या पडछाया गुळगुळीत भिंतीवरून
वर वर चढत जातात
गुड्सयार्डमधील शिळ्या पहाऱ्यासारखी
विडी ओढत बसते येथील स्तब्धता
रायफलीस चढलेला गंज
वर्षातून दोन पिकं काढण्याइतका
अॅन्युअल इन्क्रिमेंट, कन्व्हेयन्स अलौन्स, एक्स-ग्रेशिया
यातून चरत जातात जनावरं
गळ्यात अडकवून लोढणी
गोठ्यात परततात संध्याकाळी
त्यांची गुबगुबीत कलेवरं
डिपार्टमेंटल स्टोअर्समधे ठेवलेल्या दावेदार वस्तू
ही फक्त घोषणा आहे; माहिती-पत्रक नव्हे ।

५ सोसायट्यांच्या थंडगार सावलीत
न्यूरॉसिसचं झाड : नंदाच्या घरी वाढतोय
कृष्ण
उदास व्हायचंच आहे तर स्टेथॉस्कोप
हवाच का ?
पाण्यात बुडवून पाय रंग लावतोय
मी
माझ्या चेहऱ्याला
मी तटस्थ की मी विग्रही की
मी सेल्फ-अॅनॅलिटिक.

## बंदोबस्तात

बंदोबस्तात मिठी मारावी कवितेतल्या एखाद्या ओळीला
खस्ता खाव्या तसा खरत्रस ओरपावा पहिल्या धारेचा
डिंग डॉंग डिंग डॉंग सवयीने तंगडी वर करावी
सृजनात्मक विसर्जनाचा गाळीव नमुनाच
जमेल तसे उसवावे रक्ताशय सोडवित सोडवित
पिंपळपानाच्या रेषारेषांमध्ये गच्च चिनावे स्वतःलाच
किंवा जमल्यास डोळ्यातली कावीळ शिंकरून टाकावी
झिंग डिसेक्शन करता करता झिंगाव्या चाकू-सुऱ्या
हातांच्या करवती : कर्त्या माणसाने झिजावे इतरांसाठी
कराकरा खाजवून घ्यावी खाज लाज सोडून बिनदिक्कत
जवानी बर्बाद करता आली तर पहावे चाचपून
आंधळ्यालाही सवयीने जमते सारे म्हणून वैषम्य न वाटता
जवळीक करता आली तर श्वासांना उलटून बघावे
दगडाखालचा विंचू परतून त्याचे चुंबन घ्यावे
ढुंगणाचे तंबोरे बेताबेतानेच गवसणीत
बत्तीस नंबरचा तमाखू दाढेत खोवून शंटिंग
अव्याहत वारे कुस्करता आले तर द्यावे पेटवून
डिपांग डिपांग तडिपांग डिपांग सररररररररर
बंदोबस्तात मिठी मारावी कवितेतल्या एखाद्या ओळीला.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १८८५६

**चळत**

चळत शब्दांची जाते नकळत चौकट विस्कटून
बोथट होऊन खिळे पितात आभाळ व्यथा
गुल्बशी अपुऱ्या दिवसांची.

हळूच हसते पॅंट डेकॉराईनची जुन्या बाजारात
ढगाळलेल्या गालाचे खुंट बघून मालकाचे
रस्त्यावर होऊन बसते बाजारबसवी.

नाकफुटक्या कपाला सात मण चहाचे आधण
चिपाडे बशीच्या डोळ्यांची बघता बघता
ओठ वितो सातइंच्या.

चळत शब्दांची जाते नकळत चौकट विस्कटून
चौकट........च........ळ... ...त........विस्कटून ... ...
प्राण केव्हाचा गेलेला असतो.

**एकाकी**

पातिव्रत्याचा पदर डोक्यावरून घेतलाय
दिशांनी
ह्या दिशांची वस्त्रं फेडावीत
मी जर असेन एखादा कवी
तर करपलेल्या जिनियसची कातर
चालवीन मी ह्या आभाळावर
खाली कलाबुतीचा भुसा
रिलेटिव्ह टर्मसच्या कॅलरीज
वाढवून मी गगनबावरा
मी जर असेन एखादा कवी
तर माझेही होईल वीर्यपतन एखाद्या सोन्याच्या दिवशी
क्षितिजावर उगवलेला एकाकीपणा माझाच.

## मुमताज

दिशाहीन कवितेचे एक पर्व मी
भरून घेतले आहे छातीत
अशा वेळी तू मला सोडून जाऊ नकोस !

माझ्या देहावरली झाडे आता डोळे मिटतील
उजाडेपर्यंत तू किलबिलू नकोस !

तळहातावरल्या रेषांना समुद्रस्वप्न पडतंय
फार जोसात तू वल्हवू नकोस !

श्वासागणिक एक ताज उभारला जातोय
मुमताज व्हायचं तू टाळू नकोस !

दिशाहीन कवितेचे एक पर्व मी
भरून घेतले आहे छातीत
अशा वेळी तू मला सोडून जाऊ नकोस !

## थारोळं

किर्केगार्ड यार्डात पडून आहे : थारोळं
चक्क कवितेचा सुरा
त्याच्या छातीत
अस्तित्ववादाच्या चिळकांडया : थारोळं
किर्केगार्ड यार्डात पडून आहे
गडगंज शब्द :
हर्निया झालेले गडगंज शब्द
: म्हणजे आता सुखानं झोपता येईल

म्हणजे आता कवतिकाचं तेल चोपडता येईल डोक्यावर
म्हणजे आता कॅरमच्या सोंगट्या बरोब्बर पॉकेटमधे जातील

किकगार्ड यार्डात पडून आहे
आता फ्लॉवरिंग कॅक्टसची कावीळ झाली तरी हरकत नाही
किर्केगार्ड यार्डात पडून आहे : थारोळं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम.................... दि: ........
.............................

**पाण्यावर आली साय**

कवितेची छत्री काखेत मारून भर पावसात भिजणारा मी
डोळ्यांची कळ काढता येत नाही म्हणून व्याकुळ झालेला मी.

माझ्या रक्ताचा गुलाल होईतो तुमचे खलबत्ते चालू ठेवा
उचकीतल्या आठवणींची भाकरी करपेतो तवा लाल ठेवा.

पाण्यावर आली साय तर तेवढे मात्र कळवू नका
थुंकीखाली जगबूड झाली तरी झोप मात्र चाळवू नका.

त्याचे असे झाले म्हणे, प्रत्येकाच्या पायाला होते जिने
ठसका लागला तर नव्हते पाणी, पाणपोई उघडली म्हणे.

काप गेली भोके राहली भोकामधनं हत्ती जाय
तर तेवढे मात्र कळवू नका, पाण्यावर आली साय.

**पडसादाची कविता**

ह्या इथे शापित पडसादांची नसबंदी होतेय
विस्मरणाचे उलटे पाय
मी शपथांच्या घळीत अडकलोय
सूर्यकिरणांच्या प्रदीर्घ जांभया
माझ्यापर्यंत येऊन पोचताय्‌त
तेवढाच दिलासा पांथस्थाची तहान
मी शपथांच्या घळीत अडकलोय.

हा वळ बनून काळ येतोय
ह्या जखमांच्या खपल्या पुस्तकी अक्षरे
आतल्या आत सुकत गेलेल्या बब्बुळांचे घोरणे
फक्त ऐकू येतंय घसघशीत
मी शपथांच्या घळीत अडकलोय.

माझ्या कुकाऱ्यांना झालाय पोलियो
झडलाय झाडझडोरा माझ्या कानातला
दूरवरल्या ज्वाळांचा वास फक्त मांसमय
इथे गळ्यात सुक्या आंवळ्यांचे पीक
मी शपथांच्या घळीत अडकलोय.

## मृत्यूनंतरची कविता

मी हलक होतो आहे कवितेला पंख फुटल्यानंतरचा
एक अचेतन, नास्तित्वाचे पावसाळे उरावर बसवून
घोडे पळवतो आहे नेऊन भिडवतोय त्या ठिपक्यापाशी
जिथे एक अंतीम स्मारक जांभया देत रुजलेय कधीचे
विसरता विसरता रात्रच गळून पडते देठापासून;
म्हणून मी देठांनाच माझे ओठ डकवले आहेत.

चला तर अखेरचे दाहक संस्कार पाळीव जनावरासारखे
माझ्या अंगावर सोडा म्हणजे कवटीतले कवडे
सुसाट पळता पळता अखेरची फडफडलेली ओळ दिसेल
पाण्याची कातडी सोलावी तसे जातील तडे
शेवटच्या संगमर्मरी अश्रूंचे पाषाण-पंडित.

ढगांचे धडहीन सोलीव बोकड आकाशात उलटे
तुम्ही या आगीवर घ्या भाजून तोपर्यंत
माझ्या पायाचे एकविसावे बोट गळून पडेल
असे करता येईल तर कराच की जेथे उसासेच
उत्तरक्रिया करताना देह सोडतील सती जाऊन.

कळत होते तेवढ्याचे लोणचे घातले मुरत उद्याच्या
टेस्टसाठी म्हणून तुम्ही ठरवू नका मला शहाणा
मरणानंतर का सरणावर बुद्धिबळाचे डाव रंगतात ?
काळीज हातावर ठेवून मी निघालोय समोरच्या वाटेने
तर माझा पाठलाग करणाऱ्यांनो, एवढेच ठेवा ध्यानात
की मी मेलो म्हणून टाळ्या पिटल्यात ते हात तुमचे नव्हते.

## परिक्रमा

ही माझी एक पुराणी आदत आहे,
या कहाणीची अक्षत तुमच्या हातावर ठेवीत आहे.

छऱ्यांनी छिन्नविच्छिन्न होते कवड्यांचे कवडीमोल जिणे
आणि काजळाच्या फासात डोळे चढतात सुळावर
किंवा पुळणीवर चुरचुरतात फोडणीतल्या लाटा
इथून सुरवात करायची म्हटले तर सहज शक्य आहे.

कुणाच्या धमन्यांतून नुसतीच स्वप्ने वाहिली ?
कुणाच्या प्रतीक्षेत मातीला भोके पडली ?
कुणाच्या पावित्र्याचे ताम्रपट झळकले ?
कुणाच्या लज्जेवर प्लॅस्टिकची सर्जरी झाली ?
हे प्रश्न आता बाद झाले तरी चालतील.

उपासाचे दिवस डुलत येतात, झुलत येतात
सोमवार उपास गुरुवार उपास शनिवार उपास
मधले वार उपास आयुष्यच उपास
उपासाची भजी आणि उसळपाव
एका वेडयाला दिले पैसे पावउसळीसाठी
त्याचे शंभर श्रावणी सोमवार
उपासाच्या उग्र तपस्येत माती कालवायला
ती संध्याकाळ कधी ठेपणार हे ईश्वरा !

ही माझी एक पुराणी आदत आहे
या कहाणीची अक्षत तुमच्या हातावर ठेवीत आहे.

मांडीवर सांडलेले चहाचे कप कपाचे कपचे
आयुष्य कपच्यांत वेचून बहाल केले
कोण्या कोणीस तिची प्रतिबिंबे इतस्तत:
त्या हिडीस थयथयाटात आमंत्रणे नाकारली
रस्त्यांची आमंत्रणे समुद्राची आमंत्रणे
थेटरांची आमंत्रणे श्वासांची आमंत्रणे
अबोलीच्या फुलांची आमंत्रणे आमंत्रणांचे अबोल ढीग
उशापायथ्याशी उकिरडयांची अदलाबदल.

मेंदूचे मेदूवडे ओठांचे गुलाबजाम
दातांच्या उसळीत उसळते यौवन
डोळ्यांचे कबाब बोटांच्या शेवगाठ्या
लघ्वीदार बेवडयाचे रतीब
पाठीवर वाटलेल्या चटण्यांचे गोळे
आणि मनगटावर कोरलेले एखादे खजुराहो
गजकर्णासारखे चरत चाललेले ते पुरातन शहर
ज्या दिशेला बोट जावे तेथे नकली बाजार
या ग्रॅंड रिडक्शन सेलचा कापूस पिंजतच राहणार का?

सरणावर रचल्या गेल्या सरत्या आठवणी
चितेवर देह जळताना रडले नाही कुणी
रानारानात घुमवली शीळ पक्षी नाही आले तीन
रस्त्यावर बडवला ढोल फक्त ऐकू आली किणकिण
केसात भरल्या काटक्या
नि अगा कावळ्यांनीच घरटे केले

केळ्याच्या सालीवर माया केली ऊबदार
तोंडघशी पडताना फिदफिदली पाल
एखाद्या चुकार कागदावर खरडल्या चारशे ओळी
मृत्युपत्राच्या मायन्याशी अजून का रेंगाळते शाई ?

ही माझी एक पुराणी आदत आहे,
या कहाणीची अक्षत तुमच्या हातावर ठेवीत आहे.

एक गिरकी नुसते स्वस्तिक
फडफडणाऱ्या रेषांची फिरकी
ना गोत ना ढिल्लम् ढिल्ल
नुसती मुक्की तीर नि आतल्या आत
पतंगाच्या उरात जळणारा घासलेटी मांजा
पेच लागून काटम्काटी सुरू होतानाची
एक अजस्र आ वासलेली अजगरी
काटलेल्या पतंगाला अडविले मी लग्गाने
किस खुशीपे तू ये कर रहा है प्यारे !

कागदी अश्वत्थाम्यांच्या होड्या
नकली रक्ताची पिंपे भरभरून वाहिली
महापुरात तरंगले गावठी गंगेचे बलशाली पुत्र
त्यांच्या पदचिन्हांचे ठसे दाखवतायत दिमाख
हजारो दिवसांचे प्रखर फ्लडलाइटस् त्यावर
श्वास रोधून बसलेले क्लायमॅक्स
मृत्यूच्या साध्या रिमायंडरने



2930 9/1/65

सारेच्या सारे ओकतात भडाभडा पित्तदायक
डिसेंट्री झालेल्या मुलासारखे चिरपतच असते
वातावरण गडगंज संपत्तीत लोळणाऱ्याने
पत्थरातल्या बेडकीला दाखवाव्या वाकुल्या.

दिवस : दिवस गेलेल्या पन्नाशीच्या बाईसारखे प्रौढ
लाडक्या राणीला लागले डोहाळे
आई आणि बायको एकाच वेळी ट्यहाँ ट्यहाँ
दिवसांना मोजून मापून गोळ्या घातल्या
पण कलेवर आलेच नाही हाती
झाडाच्या बुंध्याशी मुंगळ्यांच्या ओळी
त्यांना गोळी घालता घालता दस्त्याला आली सूज.

अटळ तुझे येणे जाणे
माझे घर तुझ्या साक्षीने जळणे
गांधार हाकीत हाकीत माझ्यात डोकावणे
निहतुक कावणे चावटस्की लाफामारोस्की
चस्की चस्की दृष्टी अनंतात लावून
यात्रा यात्रा महायात्रा
चष्मे चष्मे अपारदर्शी चष्मे
चष्म्यांचेच वरचष्मे डोळ्यांचे छळ कविताचळ
टॅली टॅली आयी हबिस पेनच डांबिस

ही माझी एक पुराणी आदत आहे,
या कहाणीची अक्षत तुमच्या हातावर ठेवीत आहे.

शुष्क ग्रीष्माच्या छाताडावर नव्हते केस
वर्तमानाच्या कासेतून धार निघता निघत नव्हती
भाकड मनाच्या पाठीवर माजली होती गोचीड
काळजाला उगवलेले केस मोजता मोजता
रात्रच न्हाव्याकडे गहाण पडते
चुकत गेली सारी गणितं म्हणून
काय मागील पानावरली उत्तरे गडप व्हावीत ?

परतीच्या वाटेची परिक्रमा करीत मी ठेवतोय प्रस्थान
मला माहीत आहे,
खांदे देण्याऱ्याचे वांधे होतात दुसऱ्या दिवशी !

**प्राक्तन**

शरीरावर असंख्य रस्ते । फूटपाथी वस्त्रे ।
लपेटून अस्तित्वाची गस्त ।
शरीरावर आजार । शरीरावर बाजार ।
मरतुकड्या शरीरांचे शरीरसंबंध ।
शरीराच्या पोकळीत रस्त्यांचे नंगे
नाच, अस्तित्वाची लुंगी ।
लुंगीसुंगी अस्तित्वाची झाडे ।
झाडे रोवून छातीत उभे शरीर ।

इथे एक तिथे एक पोकळी ।
इथे तिथे तबकडी फेरे ।
शरीर, वस्त्रे, फूटपाथ, नाच
शरीरातल्या सनातन पोकळीत ।
माझे अवघे प्राक्तन वाच ।

**तू : एक काळोख**

प्रकाश coated काळोख : एक ठिपका
डोळ्यात अंगभर
समुद्रदिवे विझवित विझवित शब्दयोगी तू
आयुष्यभर माझे अपभ्रंश साफ करीत
काळोखातून अनासक्त.

म्हणालीस,
" हजार जिने चढलास तरी
लिफ्ट मात्र जपून ठेव
प्रकाशपीक आले तरी
काळोख आत्ताच पेरून ठेव "

अनेक वितरक लुब्रे होऊन
शरीरभर आले गिरमिट लावत
खुडुक होऊन मी माझीच अंडी उबवत
किंवा रोजे लावून बेवडा मारताना
तू पोस्त मागत माझे व्रण
नेलेस धुऊन.

ती रात्र मेंग टाकून सटकली
तिचा इतिहास तू तुझ्या मिठीत
आणि काळोख भरून उधळलीस
तुझ्या यौवनाची खिरापत
गिचमिड माझ्या पौरुषाची जुकाम
झालेली नाकपुडी वितळत वितळत
नेऊन भिडवलीस एका शाश्वत परिघाशी.

एक हगुरडा पक्षी खांद्यावर
सावरीत तू माझे पूर्वकालीन चामखीळ
हुरवाळित दुनियादारीचे लवाद झुगारलेस
आणि काळोखाचे मुके क्षण स्वतःमध्ये भिरभिरले.
तू होतीस कोण ?
तुझे संपादक कोण ?
कोण तुझे चालकमालक ?
प्रश्नाच्या पथारीवर झोकून मी माझे अंग
धुंडाळले तुला प्रत्येक फुलाच्या देठात
नि हरेक मयखाने.

तू उभी होतीस
लेऊन अंगभर
प्रकाश coated काळोखाचे असंख्य ठिपके.
आता तू उभी आहेस परत
काळोख लपेटून
खांद्यावरला हगुरडा पक्षी तस्साच आहे.
एक झणझणीत आलिंगन प्राक्तनाच्या
चिळकांड्या उडवत माझ्या दिशेने
सरकते आहे.
तुझा होता अवतार याजसाठी
तर कवितेत तुझे केलेच आहेत वायदे.

## पांजरपोळ

फिस्कारणाऱ्या रात्रीचा एक मदमस्त थवा
कुशीत घेऊन गटांगळ्या खाणाऱ्या प्रेताचे लचके
तोडताना मी माझ्यातच गांडीव धनुष्याचा टणत्कार
घुमवीत अनंत योनींमध्ये जन्मणाऱ्या परमेश्वराचे
कातडे पांघरून मला माझ्यातच उबवता येतात अंडी.
प्राक्तनाची परिक्रमा करीत करीत धुवाँधार होणारा
माझा आत्मा आंडिल बैलाप्रमाणे डुरकत डुरकत
डरपोक होत जाणारी कळ सजते आहे
माझ्या नग्न डोळ्यांना जरतारी पाषाणांचे महावस्त्र
मी माझ्या प्रेतावरच खचाखच घाव घालावे का ?

शिस्नपक्ष्याच्या कारुण्यमय थारोळ्यात माझा जन्म
होताना वणवे पेटले दाहीदिशांनी सभोवताल ताल
धरीत संसदीय हलकल्लोळाने गर्भवती
रातकिड्यांचे थवे हवेतच पाय पसरतात तसे
कृतार्थ होतात सर्वत्र आतड्यांचे हिशेब
बेहिशेबीपणे झिजत जाणाऱ्या टाचांच्या बदनामवस्त्या
आणि विस्तवातच परसाकडे जाणाऱ्यांचे बेकायदेशीर
भाऊबंद नाडीबंद होतानाच तळ गाठतात.

या अस्ताव्यस्त आयुष्याचे पांजरपोळ बस्स झाले,
झिजणाऱ्या माझ्या टाचांना पाण्यापर्यंत न्या रे कुणी !

**उधळपट्टी**

आणि मुतखड्यांचेही दिवस क्षितिजावर उगवले तसे
कितीएक पावसाळे चळाचळ मुतले या देहावर पण
ओलेत्याने देवाला साकडे घातले, असे मात्र झाले नाही.

पायीच्या जळवाताने गदगदली मेंदूतली झाडे
आणि कुस्करले आतल्याआत आतड्यांचे पैंजण
ताठ राहून झंकारलो नाही, असे मात्र झाले नाही.

धो धो पावसात धुपून गेली दुपार
डोळ्यांच्या आभाळाला एकसारखे मारावे लागले ठिगळ
अश्रूंचे दाणे भरडताना आवाज होईल म्हणून
दळण काही थांबले आहे, असे मात्र झाले नाही.

काळे झाले हातन् हात रात्रीच्या काळोखात
दिलातली उचकी थांबली नाही पाणी पिऊन
छातीत माती भरून गवती फुले फुलली नाहीत म्हणून
फुलांच्या मायच्या चुती मारल्या, असे मात्र झाले नाही.

आला गेला एकेक टपली मारून गेला
कवितांची किसमिस बाशी झाली असेल कधीमधी
नेहमीच लिलावात निघालो रस्त्यावरल्या पाव-उसळीसाठी
म्हणून डोळ्यांची उधळपट्टी थांबली, असे मात्र झाले नाही.

दुपार :
२९ फेब्रुवारी
१९६९

संगमपत्ती लागल्यासारखा सूर्याचा उजळ चेहरा ।
संभोगोत्तर डोळ्याखाली ओसरलेले आभाळ ।
संडासात कुंथणाऱ्या मूळव्याधी माणसागत पडलेला वारा ।
कॉलऱ्यातल्या हगवणीसारखा अस्ताव्यस्त समुद्र ।
तारवटल्या डोळ्यांनी स्वस्थ पडलेली अफीमबाज होडी ।
पहाटेस शरीरधर्म उरकून मोकळा मोकळा किनारा ।
कॅव्हेंडर्स सिग्रेटच्या जाहिरातीतले लंबू माड ।
मलेरियाच्या तापाने पछाडलेली रोगट पुळण ।
सलून मालकागत दाढीचे खुंट वाढलेले ढग ।
मुंगळ्यांनी गोविंदा खेळावा तशा पलिकडल्या इमारती ।
काळ्या पैशांची अंडी उबवीत बसलेला मलबारहिल ।
टकलावरल्या चुकार केसागत भटकणारी चारदोन माणसं ।
मैथुन न करताही गळल्यासारखा वाटणारा मी ।।

**आकाशाचा कात**

उन्हं लोंबायला लागली
की आपण आपलं गाणं आवरतं घ्यावं
हा संकेत
आकाशाचा कात जरा भडकच
कवळी रंगून निघाली का पहावे
कानकोरण्याने कोरावी कर्णशिल्पे
दातकोरण्याने
रस्ता चुकून रानात घुसावे
एंम्प्लॉयमेंट एक्स्चेंजमधे धाडावी जीभ
दोन डोळ्यांचे नॅशनलायझेशन.

अरे, हा देहच असा
खिळ्यावर टांगलाय वासा
बेकारीत गंजतोय गुंजिवला
सतारीत आवाज खाकरला
केसाच्या किनाऱ्यावर
रोमांचांचे शहर
आजच मुद्रित घश्याची घरघर.

आकाशाचा कात जरा भडकच
सूर्याचं खांड दाढेखाली डळमळतंय.

## पान्हा

मी मोडित घालतो कित्येक कार्बनी संध्याकाळ
झाडाझाडांना मिठ्या मारत मी पुतळा होतो
मुळासकट उपटून टाकताना अंधाराची मूळव्याध
दूर क्षितिजापार माझी राख उडत जाते
तिथे एक पक्षी असतो पेंढा भरलेला.

काळोख चाळून रात्र रव्यासारखी पसरते
एखादा अखंड दाणा चुकार घरंगळताना
मी फिरतो माझ्याभोवती कुत्र्यासारखा
शेपटीतल्या मोरपिसांची स्वप्ने पांघरून.

घसघशीत दागिना घातल्यासारखा उजेड
माझे पुतळे वितळत वितळत कोलवतो
माझी विटी दूर दुसऱ्या जन्मात अधांतरी

छातीला माझ्या नसतात स्तन
तरी पान्हा जातो दिगंतरी.

## देणे

या काळोखाचे मी आता देणे लागत नाही
खरे म्हटले तर एवढाच अपराध मी केलाय
किंवा असे म्हटले तरी चालेल की
मी लागतो एवढ्याच अपराधाचे देणे
नि:संशय, निखळ, निव्वळ, निरंतर.

हे असे कसे बुवा ? या प्रश्नाला माझे उत्तर
मी पुढच्या जन्मासाठी राखून ठेवले तर चालेल ना ?
किंवा असे केले तर
चाळता येत असेल जर एन्सायक्लोपीडिया तर
शोधून पहावे ज्याचे त्याने आपापल्या कुवतीनुसार.

की चेहऱ्यावर चढवू मी सूर्याचे मुखवटे ?

## मेघांच्या पडछायांचे प्राथमिक शोक

मेघांच्या पडछायांचे प्राथमिक शोक
अनावर होतात प्रातःकालीन दवाच्या सरणावर
हस्तिनापुरात झाकळते मुखचंद्रमांचे शहर
मेघांच्या पडछायांचे प्राथमिक शोक

मेघांच्या पडछायांचे प्राथमिक शोक
अंतर्यामी पेंगुळतात डोळियांचे डोह
अजनबी सूर्याचे प्रखर अपारदर्शित्व
कळ्यांच्या सांदीकोन्यात एकटक वास्तवता
मेघांच्या पडछायांचे प्राथमिक शोक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
८७०८३ ५।०४
२९३० १।१।७८

## डायरीतले एक पान

झकासपैकी परसाकडे झाले
रविवारचे उरलेले मटण चपातीबरोबर
ऑफिसात जरा उशिराच : टायपिस्ट गोड हसली
कालच्या उरलेल्या मटणासारखी
तिचे हात म्हणजे मऊ मऊ चपात्या
टेबलावर ' अर्जंट ' केस माझीच वाट पहात
कालच्या कोंबडीची आतडी जणू
लंच टायमात रस्त्यावरून चक्षुमथुन
एकजात पोरी मँचेस्टर
बिनमासाच्या कोंबडया
ऑफिस सुटल्यावर समुद्रावर
कालच्या कोंबडीचे लालभडक रक्त आभाळभर

झोपताना बायकोची आठवण आली
ती माहेरला गेलीय बाळंतपणासाठी
तिच्या उदरात माझा बाळ वाढतोय
कालच्या कोंबडीच्या पोटातदेखील
होती बारीक बारीक कवटे.

**बिग क्लोज-**
**अप्मधल्या**
**चेहऱ्यावर**

बिग क्लोज-अप्मधल्या चेहऱ्यावर
मुरमांचे साम्राज्य
चिरायु होवोत त्यांच्या पुढील पिढ्या
लॉंग शॉटमधल्या
धूसर इमारतींची खंगलेली हाडे
त्यांना उत्तम आरोग्य लाभो
झूममधल्या गर्भार टेकडया
बाळ-बाळंतीण सुखरूप असो
सायलेन्स
स्टार्ट साउंड
कॅमेरा
ॲक्शन
कट
कटकटीच्या घडयाळातले काटे
एकमेकावर चढोत.

**च चरे चरसातला**

मिटलेल्या डोळ्यांना गर्भारपणाचं बाळसं येतंय
चरसाचे चार दम मारून मी
माझ्यातल्या परमेश्वराला डुलवतोय
डु डुले डुलातला
हातावरल्या दह्यात किती किलो जंतु आहेत ?
प्रेतावरल्या हारात किती टक्के कमिशन आहे ?
चरस येतो चरस जातो
रस येतो रस जातो
माझी आई काळी होती
मीच कसा गोरा गोरा
दहा शेर अक्कल प्यालो
पाटी भरली तरी कोरा

मिटलेल्या डोळ्यांना गर्भारपणाचं बाळसं येतंय
मी कोण ? तू कोण ?
हंडाभर पाणी पिशील
गाईएवढी गोगलगाय
सुईणीविना बाळंत होशील
च चरे चरसातला
म मरे मरणातला
माझ्या मरणात तुमचे भूत
धुणी माझी होते धूत

**गटारी अभंग**

गटाराच्या उरी
विहिरीचे पाणी
त्यात माझी धुणी                    धुवीन मी.

गटाराच्या पाशी
प्राजक्ताचे झाड
गंधाचे कवाड                    खोलीन मी.

गटाराच्या माथा
फुवारते गंगा
होऊनच नंगा                    नाचेन मी.

गटाराच्या गावा
गटारीचे पीक
रोज तर्र पिंक                    टाकीन मी.

**अनुक्रमणिका** 

रस्त्याच्या दुतर्फा झाडांच्या अनुक्रमणिका विस्कटल्यायत
कॅटातले बावन पत्ते पिसून ठेवलेयत अस्ताव्यस्त
टिचकी मारून आभाळ कोसळतंय का पाहतोय मी
अजून झिणझिणतायत बोटे कसनुशी
हे आभाळाचे पारदर्शित्व दुभंगणार तरी केव्हा ?
ह्या गंधमदन पाकळ्या कधी होणारायत बुधलीबंद ?
ही वरल्या आडयातली पांदण कधी येणाराय वहिवाटीत ?
ह्या अनुक्रमणिकेतली माझी टिचकी कितवी ?

ही कुठल्या क्रांतीची प्रसाद-चिन्हे ?
पीत की हरित ? नील की धवल ?
ह्या खुरटलेल्या भूमीत टिचक्यांचं पीक आलंय
इथल्या कागदांनी विस्कटण्याचे गाठलेयत किनारे
इथल्या कागदांवर भ्रष्टाचारी फुलाफुलांचे पेपरवेट
इथल्या समुद्रात खडकांना बेडकांची पडतायत स्वप्नं
इथल्या समुद्रात गंजतायत सावल्यांचे ताजमहाल

सूर्याच्या पाणपोया ठायी ठायी उभारल्यायत
म्हणून तर आत्महत्या करता येत नाही सर्वांनाच
हे टिचक्यांचे वेड आता गाडायला हवेच का ?
ह्या अनुक्रमणिकेत आणखी कोण कोण चिनले जाणार ?

**सार्वकालीन मीमांसकांनो**

सार्वकालीन मीमांसकांनो, तुमचे उनाड कळप आभाळभर
डोक्यात उगवलेली काटेरी झाडे छाटून
तुम्ही अ...ल ...ग ...द उतरा या भूमीवर
माय नेम इज मादरचोदोवस्की
खुळखुळ्यातल्या झोपाळू दगडांनो,
तुम्ही तुमचे खांदे उडवित रहा अव्याहत
माझ्या धमन्यांत अल्कोहोल फुललाय
न्या खुडून माझ्या डोळ्यात पडलेलं फूल
सूर्याला सनस्ट्रोक झालाय
मळवट भरा रे मळवट भरा
तुमच्या बेचाळीस पिढ्यांचे गजकर्ण
भराभर भरून घ्या भांगातून
कालची शेते ठेवा नांगरून
आमच्या वीर्यांना पूर येण्यापूर्वीच
पकपक पिकवा अधिक पकपक पिकवा
बघा, हे सत्य होऊन उडतंय ते माझे इंद्रिय
सेक्स इज दी फॅक्ट
म्हणून साऱ्या फॅक्टऱ्यांना टाळेबंदी करा
हे आभाळ आता भरून आले आहे
म्हणून सूर्यावर थोडे थुंकून घ्या
तुमच्या थोबाडात भरून ठेवा
तुमच्या हलाहली फूटपट्ट्यांचे सांगाडे
हिरोशिमातल्या काळ्या पावसातून आल्यासारखे
तुम्ही या स्मशानात उद्या
माझा एक तरी सोन्याचा दात नक्की सापडेल !

**तळटीपा : १**

टापांचा पायघोळ आवाज काढत
इतिहास बर्कतीला आला
तळटीपांचा पाऊस पडून
वाहून गेली सारी विद्वत्ता
पहिल्याने राखलेल्या दाढीला
सुटते खाज जब्बरदस्त
हे सत्य ऐकायला
मागवाची लागतात टेंडर्स कानांची
प्रेम आणि प्रेत
यात ' तम ' चा फरक
फरका फरकाने सिंहासने बदलतात
घनघोर लढाया. रक्तपात. रक्त.
मोहोंजोदारोचा बैल
डुरकतो सांजसकाळ
त्याच्या खुरांना तळटीपांचा
आजार
वेदाक्षरांचा नंदीबैल बुगुबुगुबुगु
वारकऱ्यांनी सिरियसली
कुटले टाळ
कुठले टाळ
तळटीपांचा गजर हरिनामाचा........

तळटीपा : २

फिरकीचा तांब्या
तर्ककर्कश आवाज करीत चुळबुळतो
खडावा अटक करून घेतात
स्वत:लाच
तळटीपांच्या मशाली ढसाढसा रडतात
सुताराला हातोडीने पछाडले :
पानपट्टीने तोंडात दुकान थाटले :
बोबडया थोबाडात चौकोनी लाळ
तळटीपांचे पांढरे डाग चरत जातात
शरीरभर
जाड स्ट्रोक्स माना वर करत
आटापिटा करतात
तळटीपांचं ओंजळभर निर्माल्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
C१०८३ ९१८५
2930 1/9/08
ग्रंथसंग्रहालय
१८८५६

**मी निःशंक नग्न झालोय**

: सगळ्यांना खाली कोसळवून मी निःशंक नग्न झालोय
पिक्चर सुटल्यावर निमूट घरी जाण्याची
आदत नाही आपल्याला
रुक्ष विषयांवर गप्पा मारायलाही कॉन्शस लागतो;
हे मत मी पाचव्यांदा कनवटीला लावून पाहिलं
संडासात बसून अंतर्मुख न होण्याची मॅच्युरिटी
कधी येणाराय आपल्याला ?
हे इंडियन न्यूजा, तुझा ताप का आम्हाला ?
मी मेलो तर सब्स्टिटयूटचे मनी प्लान्टस् फोफावू देत
मी मेलो तर मायक्रो-सेकंदाचा चुरा
गणकयंत्राच्या पायथ्याशी पडो
: सगळ्यांना खाली कोसळवून मी निःशंक नग्न झालोय

**त्रैराशिक**

भाडखाऊ त्रैराशिकांचे कर्मणीप्रयोग इतस्ततः
या हव्यासाच्या उत्तरक्रिया होणारायत की नाही ?
रक्ताच्या पाटाशीच ज्यांनी लावले पाट
त्यांना तलावातल्या पाण्यात विहीर बांधता येईल काय ?
नपुंसक नमाजाच्या स्वाक्षऱ्यांचे हे वारसदार
ज्यांनी टाकसाळीत ताळव्याचीच पाडली नाणी
च्युईंगम चघळावे इतक्या सहजतेने
त्यांनी आकाशातल्या अल्लाची माय काढली

**अत्याचारापुढे सत्याचा एक शब्द उच्चारणे
हा सर्वांत मोठा जिहाद आहे : महंमद पैगंबर**

उन्हं सावल्यांना कवटाळीत पारदर्शी होताना
त्या परस्मैपदी आत्म्यांनी आपले तुरूप गहाण टाकले
पण पत्त्यांच्या त्या खेळात
त्यांनी सात हात सर केलेच
विजयाच्या दवंडीला तिसरा पाय फुटला तेव्हा
अल्लाच्या चेकवरील खोडाखोडी
हरेकाच्या लक्षात आली

**संस्कृती**

संस्कृतीचे संस्कृत कळायला जरा कठिणच गेले
प्रकृतीचे प्राकृत तसे सोपे असते असे निदान वाटले
गाणाऱ्याचा गळा आणि शाळेतला फळा
डोळ्यातला वळ आणि नखातला मळ
वाह्यातपणाने खूप वह्या भरून काढल्या
बाहीवर शेंबूड पुसून बापाजीच्या सह्या केल्या
पान खाऊन थुंकावे चहा पिऊन मुतावे
इतके साधे गणित आले नाही सोडवता
संस्कृतीचे संस्कृत कळायला जरा कठिणच गेले

उत्तरक्रिया १ : तीनशे पासष्ट मुखवट्यांचा सूर्य मी
लेजरबुकात माझी एन्ट्री
पारा उडालेल्या आरशात
माझ्या चेहऱ्यावर देवीच्या मावा
कितीतरी काकड्या प्रश्नार्थकच असतात
प्रश्नांचीच वेटोळी माझ्या आतड्यात
शिग-कबाब भाजताना सुटणारा घमघमाट
प्रश्नचिन्हे नाकांची
एक जण मेला नदीत बुडून
तरी कोरडा ठणठणीत मी
छातीशी बांधून थडगी
बडबड बडवतोय
दुःखार्त गाण्यांची वाडगी.

२ : तीनशे पासष्ट मुखवट्यांचा सूर्य मी
माझी दोन वर्षांची सवलतीची वर्गणी
अमुकअमुक
सुरू करता येतो अंक कोणत्याही
दिवसापासून
बाहेरगावचा चेक पाठवताना पन्नास पैसे
वटणावळ अधिक.

स्वप्नं पडतात मला मी कांगारू असल्याची
अर्ध्या तोकड्या पायांची
खायलीकडल्या पिशव्यात पिल्लांची
पॉकेटमनी

खुरट्या गवताला मी लाथ मारल्याची
तळहातावर डोळे ठेवून चुन्यात मळल्याची
कंपोझिटरच्या जातीत जन्माला आल्याची
स्वप्नं पडतात समुद्रावरल्या ओझोनची
दिवा लावला तर हातआडोश्याची
चौकशीच्या काउंटरमागील भेज्याची
स्वप्नात मी प्रश्नचिन्हं
उलट्या पायांची.

४ : तीनशे पासष्ट मुखवट्यांचा सूर्य मी
मी पाहतोय तर...
कोणी एक गळा फोडून ओरडतो :
या शहरातली बेकारी खाटिकखान्यात
नेत का नाही ?
महावीर जयंतीला ताजे मटण
मिळणार नाही
मेलॉर्ड, या केसची मला कॉपी हवी आहे
मी मांडली आहे कुंडली या साऱ्यांची
फादरचीच कन्फेशन्स
हवीत मला मुद्देमालासह
जो हमसे टकराएगा
मुट्ठी भर दिया जाएगा.

५ : तीनशे पासष्ट मुखवटयांचा सूर्य मी
मुखवटयावरही उठतात मुरमांचे थर
गोविंदा करीत करीत
आणि बुरख्यावरही उमटतात पितांबाच्या चाख्या
अखिल भारतीय पक्षाची मान्यता
काढून घेतानाची
खवखव घशात
माझे जन्मताच कान टोचले
प्रश्नचिन्हांनी
आणि सुन्त्याच्या वेळेस
रक्तलाल भळभळ प्रश्नप्रवाह
हरे राम हरे प्रश्न
प्रश्न प्रश्न हरे हरे
प्रश्नांच्या उत्तरक्रिया मर्तिकमग्न.

**प्राणांतिक जखमांची वस्त्रे**

प्राणांतिक जखमांची वस्त्रे मी अंगावर चढवतो
त्याला कोणाचे ऑब्जेक्शन असेल
तर ह्या शहराला मी जाळीत सुटेन
मग जळलेली थोबाडे गहाण ठेवता
येणार नाहीत मारवाड्यांच्या पेढीवर
याचा असेल विवेक एखाद्याच्या तरी खिशात
त्यांनी पांढऱ्या निशाणांच्या ऑर्डरी टाकाव्या लगोलग
पावटे खाऊन लढाई करणाऱ्या चोरांनो,
तुमची पलटण जमिनदोस्त होईल
पाटलोणीतच तुमच्या.

**पुतळ्यांचे साम्राज्य**

सार्वजनिक बागेत सार्वत्रिक मरणांचे अवशेष
मी पाहतो माझ्या सार्वजनिक दगडी डोळ्यांनी
माझ्या बापजाद्यांचे पुतळे
ज्यांनी कालपर्यंत बागेतल्या फुलांशी
व्यभिचार केला
या व्यभिचारांचे हे सार्वजनिक दगडी पुतळे
झाडाखाली उकरलेल्या मातीत
हे आपली विष्ठा विसर्जन करतात
हे माझ्या दोस्तांनो
तुम्हाला या बागेत पाऊल ठेवायचे असेल
तर
सार्वत्रिक मरणांचे अवशेष पाहणारे
माझे सार्वत्रिक दगडी डोळे व्हा,
हीच सार्वजनिक अट इथली.

सत्य

प्रार्थनेचे मंत्र पुटपुटणारी सरणावरली अखेरची तडतड खरी की
कावळ्याची शीट अंगावर पडून फळफळणारे भाग्य
की न्हाळावर तरंगत जाणाऱ्या प्रवाहपतित
लेंडकीप्रमाणे लॉजिकल स्टेटमेंट.

कुठल्याही दोन गोष्टींतला व्यत्यास अच्चळ
पकडता येतो चिमटीत
किंवा दोन डगरीवर पाय ठेवून झोपता येते उभ्याने
हे असेच पार्थिवतेपाशी पुतळा होऊन रहायचे असते
म्हणून मेंदूतल्या चुलाणावरली रटरट धुमकावते खुल्लमखुल्ली
आणि पिंपळपानावर अतोनात
शिट्ट्यांचे कर्कश्य आवाज पसरतात
जाळीदार रेषांच्या ऐतिहासिक सत्यावरले पापुद्रेच.

हेही सत्य आणि तेही सत्यच तर परमेश्वराला
गस्त घालण्याची गरज काय?
(पापण्यांनी घरे शाकारता आली तर तेवढे पहाच बुवा!).

फार झाले आहेत : असे रफार
गुणगुणण्याला कितीने गुणावे ?
रफारात गाणे चिणावे.

फार झाले आहेत : असे रफार
वात्स्यायनाच्या कर्जाची फेड ?
रफार उडतो: मुद्दलात खोट.

फार झाले आहेत : असे रफार
करपलेला कर्ता किसलेले क्रियापद
रफाराने नासवल्या तलावातल्या मासोळ्या.

फार झाले आहेत : असे रफार
गिर्यारोहक मोहक
रफाराचे बाल्लेकिल्ले झिंदाबाद झिंदाबाद.

फार झाले आहेत : असे रफार
बिछान्यावर कल्पना-विस्तार
नाकातल्या नथीत गरोदर रफार.

फार झाले आहेत : असे रफार
कुयरीत कुंकू फार नका वाकू
रफाराला लागला मांडव.

## इन्काराची कविता

तिठ्यातिठ्यावर इन्काराचे जनरेटर्स
मोहल्ले मोहल्ले रवंथ करतात अपूर्णांक
शरीरभर कंपास लावून दुःखाचे
टकारान्त वर्तुळांचे ऊहापोहच
अंगवस्त्रांची शहरे भरभराटीस येतात
कवळी लावून गावभरच्या गजाली
अक्करमाश्यांतही असतात पद्मश्री पद्मभूषण
तिठ्यातिठ्यावर इन्काराचे जनरेटर्स

तिठ्यातिठ्यावर इन्काराचे जनरेटर्स
क्रेन्स उचलतात अल्लद काकपदे
समाजाचे समास मध्यमपदलोपी
रापण लावून कलागतीचे म्हावरे
बायकोचे यार पेरलेले सभोवती
अग्यारीत मनाईनेच जळतात सिग्रेटी
साकव वाकतात कराराच्या आकडीने
कानशीने दात घासून हाडांची मोडतोड
बारुदाच्या ढिगावर डग्यांची मैफल
तिठ्यातिठ्यावर इन्काराचे जनरेटर्स

**दान**

विषुववृत्तावर बांधावा बंगला
आणि थंड हातांचा चंद्र
ओरबाडून थापावी मेंदी
ज्या रानात कधीच पेटले
नाहीत वणवे तेथे
कानाखाली काढावेत आवाज
रिफ्लेक्टरचे दंश सहावे डोळ्यांनी
सेप्टीक झालेले सूर्य पिदवावे
भादरता आले तर पहावे
शहाणपण ओठावर
गळ्यात घालून माळा
लपवाव्या गंडमाळा
एखाद्या विषण्ण संध्याकाळी
कडकडून व्हावे व्यथामुक्त

हेचि दान देगा देवा
जो तो ' काम 'चोर व्हावा

**कागज़ के फूल**

एक राजवर्खी कबूतर
साऱ्या कातरवेळा एकवटून कॅन्सर
त्याचे गंगाजमनी गुटूर्रर गुटूर्रर
का ? का ?
।। काही माणसे अशी एकमेकांना
अधिकाधिक का ओळखत जातात ।।
सूर्यप्रकाशाला ऊन बाधते
त्याने सूर्यावर कधी थुंकून
पाहिले होते का ?
।। मैं कौन तू कौन,
तेरा मेरा क्या वास्ता ।।
आयुष्यच असे वास्तविक हे ईश्वरा,
मी गुरुदत्त तू वहीदा
तू आहेस तरी कोण ?
की तू एक कागज़ के फूल.

## टक्कल पडलेला सूर्य

टक्कल पडलेला सूर्य चोचीत घेऊन
उडाले पाखरू
आकाशाची काळी गळवे फुटून
चिळकांड्या
वडाच्या ढोलीत बाळंत खार
पुरतेय नाळ
ओढ्याच्या डोळ्यात पुरून ठेवली
दुपारची धुणी
समुद्रलाटा निजतात केव्हा
झिजतात तेव्हा
कोळ्याच्या जाळ्यात अडकला काळ
किती काळ
पाउलवाट भोसकली जातेय स्वतःत
तांबडमाती
शेतातले बैल पतळून सैल झाले
शेणाचे पोव
दारातली कोंबडी मारते डोळे
नातू चळे
सज्यावर बसले काळे कातळ हगत
तासन्‌तास
रानातली अळवत करते वडे
पोटाला तडे
चाफ्यावर सुकते मारुतीची लंगोटी
लाजे जास्वंद

टक्कल पडलेला सूर्य चोचीत घेऊन
उडाले पाखरू
माझे चित्र गाडलेय पुरातन काळोखात
उत्खनन करू

**चिव**
**चिमणे**

चिव चिमणे मलमली स्तन
डोळ्यात गोंदलेस तू
माझ्यासाठी पदर ठेवलास
पसरून आभाळभर तू.

चांदण्या उगाळून कांतिमान
स्नात वेल जशी तू
नव्हती ओळख रानातली
पिकं करवंद झालीस तू.

**ओल्या बाळंतिणीसारखे**

ओल्या बाळंतिणीसारखे
आभाळाला जपावे का ?
पिकत चाललेल्या आंब्याच्या
कानशिलात भडकवावी का ?
कावळा बसलेल्या डहाळीला
जीवदान द्यावे का ?
सुतावरून स्वर्गाला जाताना
मधे विश्रांती घ्यावी का ?
पर्मेश्वराच्या गळ्यात देवळाच्या देणगीची
पावती मारावी का ?

मास्तर चूळ, चुळीत काळी बिजगणिते
मास्तर जांभळ्या प्रमेयांचे दिवस
भिरकवडे ( उत्तरे पान अमुक अमुक वर )
डोळे मार गप्प गार
ऑफिसात जाऊन हेडसरांना भेट
भूगोलाची बाई ती माझी आई
विषुववृत्त बापाने पाहिले नाही
आले आले संडास-दिन
केळकर मास्तर बस्स दो या तीन
राम राम सतावळं कार्ट्यांनी मरा मरा
वाल्या कोळी आला कुऱ्हाड घेऊन
मुलांनो कल्पना विस्तार करा
म्हणा चोवीस एके चोवीस
चोवीस दुणे नंदा साठेला किस
भिंत पिवळी बाकं पिवळी
पिवळी चूक आली कुठून
कानाची पाळी गेली तुटून
मास्तर मास्तर भिरकवडे
पोरा लोकांचे घर ... ...

**हँगर**

हा हँगर आहे. हा टूथब्रश.
: आणि हे अबॉर्शन.
हँगरवर टूथब्रश आहे.
टूथब्रशाचं अबॉर्शन.
देवघेव. अनुभवांची.
टूथब्रशाचं अबॉर्शन कुठलं ?
की सविस्तर आरोपपत्र ?
: आता हँगरला प्रश्नचिन्ह लावूनच पहावं.

ठसे

क्षितिजावरले वळण गुलाबी वळेल सागरकाठी ?
ही सांज जरा का झुकेल माझ्या ओठी ?

तकतकणाऱ्या जलाशयावर ठसे वितळले कोणी ?
शराबातली माझी काया अशी पिंजली कोणी ?

हाच
वारा
जर
मनात
जिरेल

हाच वारा जर मनात जिरेल
पंख झिंगून कडाकडांनी उडत जातील
गाण्यांच्या चिजा होऊन सावकाश आभाळ उतरतील
फुटेल वास झरोक्यांना
गुद्मरणारे क्षण होऊन क्षितिज येईल चोरपावलांनी.

हाच वारा जर मनात जिरेल
दार वाजून नक्षत्रांची नाणी खळाळतील
ओल्या वाटाण्यात चोळी रुतेल
पसरट काजळात रेघा ओढून
बुडेल पापणी जिवानिशी.

हाच वारा जर मनात जिरेल
मनात जिरेल जरतरची भाषा
चार अक्षरांची भाषा होऊन बसेल कादंबरी
खुणेची डॉगइयर्ड पाने
कान टवकारून उठतील
हाच वारा जर मनात जिरेल.

## गटारी अमावास्या

फ्रिगेट बुडावी तसं हे शहर बुडालं आहे
अल्कोहलाची फुलं माळून
चवल्या पावल्यांत खच्च गटारी अमावास्या

येथील माणसं करतात कविता
फक्त दहाच्या आकड्यावर
मोर्चे असोत नाहीतर मिरवणुका
पावशेर तर लागते सारी
कनवटीलाच असते नीतीमत्ता कायम

लघ्वी करायलाही लायसेन्स लागतं ज्या शहरात
तिथं गटारीची पिकं पन्नास

खोकला झाल्यावर कुणीही खोकेल
कूस बदलावी अश्या सहजतेनं
करगोटयाचा फास गळ्याला लागतोच आहे
सिझोफ्रेनिक कवडश्यांची भट्टी लावून
हे शहर
फ्रिगेट बुडावी तसं बुडालं आहे
अल्कोहलाची फुलं माळून
अहेवपणीची गटारी अमावास्या.

९०६३ काव्य
२१३० १।१।०४

**ओरखड्याची कविता**

ओरखड्यांचे पोस्टमार्टेम होवो
शहाऱ्यांची शहरे उद्ध्वस्त होवोत
मेणा वाहणाऱ्या भोयांचे पाय तुटोत
हाडांच्या पोकळीत कॅबरे चालो
थर्मामिटरचे झाड उन्मळून पडो
नाक्यानाक्यावर श्वासोच्छ्वास फळोत
प्राचीन मराठी कोरीव लेखांना टक्कल पडो
ग्रांथिक मराठी भाषेला गळू होवो
ऋग्वेदातील ऋचांचे पानिपत होवो
अधिकृत विक्रेत्यांच्या बायकांना वेड लागो
सुबक वळणाच्या देवनागरी टायपाला वात भरो
पावणेआठ सरदारजींचे बारा वाजोत
' मौनालाही अर्थ असोत ' असे म्हणणारे--
मौनव्रत धारण करोत
संपादक, मुद्रक, प्रकाशक यांनी येथे छापून तेथेच--
प्रसिद्ध कलेची गोल्डन ज्युबिली होवो
या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत
असतातच असे नाहीच्या बैलाला हो !

**कबरस्तानातील**
**जळत्या**
**मेणबत्त्या**

पाळीव घुशी साफ करीत असतात मिश्या
पलिकडले पांगाऱ्याचे झाड घालतेय रेच
वाऱ्याच्या चाळणीतला पतेरा
नल्ल्याक पोरासारखा
कधीमधी त्याची मिरगीची सवय
बदलते कूस
( मेणचटलेल्या उशीवर कबरीतले प्रेत
गर्भवती होण्याचं पहातय स्वप्न )
पावसाळ्यात तिरमिर चिखलाला
बेंबीत भरते सणक
हरळीच्या वार्तापत्रात त्याच त्याच बातम्या
वाचून पांगाराही चढवतो
जांभईची गोळी
दूरवरला ओढा नेहमीच्या पत्रावळीवर
भरतो चकल्यांचा तोबरा
आणि फतकल मारून बसलेली
चार हातावरली चिंच
सुजलेल्या त्या अक्रिताकडे पहाते
कौतुकाने
( कबरस्तानातील जळत्या मेणबत्तीचा फुत्कार
कुणालाच नाही ऐकू येत. )

**शुक्रवारचे गीत**

सुंता न झालेला एक ज्यू : एक क्रूसिफाइड गाणे
गाई : ' इगदाल् एलोहीन....'
धमन्यात गंजलेले पोलादी खिळे आवरून
तो म्हणे,
' शालोम !'.......शांती....शांती....
पियानोच्या बत्तीस पट्ट्या त्याच्या मुखातून स्वर गुंफीत
...सर्व सैनिकांस आमचे प्रणाम असोत....
....' कोलहाकाबोदले खलीयीम शेलान् '....
दु:खातीत अर्ततेचे चंदेरी चषक उंचावून
तो म्हणे,
' लेखाईम ! '...good luck ...
कुत्राच्या तोंडातल्या नामदेवी रोट्या
तो भराभर उतरवित होता....डोक्यावरून ... तव्यावरून
डोळ्यांतून वाहणारी स्निग्धता
कुत्र्यामागून पळत असताना त्याला ठेच लागली
वेसुनत ओठांचा—शब्दहीन ओठांचा परमेश्वर
प्रेषित होऊन त्याच्या जखमेत उतरला.

सुंता केलेले ज्यू शुक्रवारचे गाणे गातात;
यहोवाचे शास्त्रनियम मोशेच्या हाती दिले जातात.

**पूर्वदत्त सामग्रीची कविता**

शिळाप्रेसवर छापलेली पोरं
वोट फॉरच्या जाहिरातींसारखी
डकवली जातात
सार्वजनिक भिंतीवर : मुन्शीपाल्टीच्या मुत्र्यांवर
लायनोवर सतत खदखदत असते
रोमन बारा पॉईंटची शिसारी
चार घास खाऊन वर ज्याला
आचवताही येतं
असा सूर्य अजून उगवायचा आहे
खोलीत गॅस सोडून करण्यासाठी
आत्महत्या
सिलिंडरची बिलं भरण्याची ऐपत
पारखावी ज्यानं त्यानं
डोक्यावर चुंबळ ठेवून
सगळीच ओझी उचलता येतात
असा भ्रम
ट्यूब-बेबीनं जन्मायचेत कुलदीपक
अजून
गॅसच्या बत्तीसारख्या भगभगणाऱ्या संज्ञा
पचवण्यासाठी
पाचक आमसुले मिळतात बाजारात
म्हणून गॅसट्रबलचे पेशंट व्हावेत का कमी ?
शिळाप्रेसवर छापलेली पोरं

वोट फॉरच्या जाहिरातींसारखी
डकवली जातात
सार्वजनिक भिंतीवर : मुन्शीपाल्टीच्या मुत्र्यांवर
म्हणून गोंदाचे भाव कडाडावेत का ?

**काही माणसे**

काही माणसे पंचाने भोके पाडून
फाईल करून टाकावीत
फिल्मी गीतांना उडीद टाकून
मूठ मारावी
कोकिळेच्या घरट्यात एकदा कावळीने
बघावे अंडे घालून
वाल्याच्या घरची धुणी धुता आली तर
पहावे वाल्मिकीने
गॅसटूबलातल्या पेशंटागत दुःखांनी
आवाज करावे
स्तनांची पिस्तुले रोखता आली तर
पहावे एखाद्या सुंदरीने
हॅण्डस्-अप च्या आवाजात बरसावे
बब्बुळांचे चांदणे
टाकावी पिंक लालेलाल
इतिहासाचे चघळून पान
ब्लॅकआऊट म्हणजे कर्फ्यूऑर्डर नव्हे
याचे ठेवून भान

## दळदार
## डोळ्यांचे
## कलंदर
## इतिहास

दळदार डोळ्यांचे कलंदर इतिहास
सर्वत्र अस्ताव्यस्त माझ्या शरीरभर
मी माझ्या स्तनावर गोंदल्यात
सस्तन गटारी अमावास्या
श्वास उच्छ्वास स्वप्नमैथुनी पराक्रम
जांघांच्या आसपास फोफावलेत
कटेल्या आयुधांचे तहकरारनामे
आजीव पराभवाचे कारखाने
धडधडतायत गल्ल्यांचे किल्ले सपाट
डोळ्यांचे ओठांचे गनिमीकावे
खक्षतांचे असंख्य घाव मांड्यांवर साहून
: त्याचा बाप : आजोबा : पणजोबा
काच रणांगणावर इतिहासाचे भादवे
हे माझ्या मागील पिढ्यांच्या पहारेकऱ्यांनो
हे ओपन सिक्रेट तुमच्यासाठी
हे माझे हात तुम्ही कलम करा
हे माझे गाल बरणीत मुरत ठेवा
हे माझे केस आभाळभर पेरून ठेवा
दळदार डोळ्यांचे कलंदर इतिहास
सर्वत्र अस्ताव्यस्त शरीरभर
मी जेव्हा मरेन तेव्हा
माझ्या कबरीवर खोदा
॥ हा माणूस एका वेश्येच्या घरात जन्मला ॥

REFBK-0018856
REFBK-0018856
१८८५६



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
९०६३ ... ६।८१